नियमीत फौजदारी खटला क्र. **३२/२०२५**
निशाणी क्र. **१३/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **निल यशवंत पाटील** |
| वय सुमारे | : | १८ वर्षे, व्यवसाय : शिक्षण |
| निवासस्थान | : | मु. धोकवडे भाग–१, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहा. सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत</u>** :

माझे काका रवि लक्ष्मण पाटील यांचे चोंढी गावाच्या हद्दीत मोटरसायकल दुरुस्तीचे गॅरेज आहे. मी तेथे अधूनमधून काम शिकण्यासाठी जात असतो. दि. ०८/१२/२०२४ रोजी सायं. ०५:३० वाजताच्या सुमारास गॅरेजच्या बाहेरील शेडमध्ये काम करत होते. त्यावेळी अलिबाग बाजूकडून रेवसकडे जात असलेली निळ्या रंगाची बी.एम्.डब्ल्यू. कंपनीची कार क्र. एम्.एच्. ०६ बी ई २०० ही गाडी गॅरेजच्या शेडमध्ये घुसली. तेथे काम करत असलेले माझे काका रवि पाटील व मशिन रिपेअर करण्यासाठी आलेले मंगेश म्हात्रे व सोनू नाईक यांना गाडी येवून आदळली. मी गॅरेजमध्ये काम करत होतो व पाने आणण्यासाठी काकांनी मला आत पाठविले होते. अपघात झाल्यावर आम्ही सर्व तेथे जमलो. आम्ही अपघातातील जखमींना अलिबाग येथील सिव्हील हॉस्पीटलमध्ये नेले. बी.एम्.डब्ल्यू. कारचा चालक संदीप गायकवाड होता. तो गाडीमधून बाहेर आला तेव्हा त्याच्या तोंडाला दारुचा वास येत होता. अपघाताचा आवाज आल्यानंतर मी बाहेर आलो होतो व मी पाहिले की, मशिन रिपेअर करण्यासाठी आलेले सोनू नाईक व मंगेश

म्हात्रे यांचे पाय गाडीच्या मध्ये अडकलेले होते व काका गाडीच्या खाली होते. संदीप गायकवाड गाडी चालक हा गाडीमधून बाहेर आला. मी व जमलेल्या लोकांनी काकांना गाडीच्या खालून काढले. गाडीमध्ये संदीप गायकवाड हे एकटेच होते.

०२. त्यानंतर मी पोलीस ठाण्यात गेलो होतो व फिर्याद दिली. आता मला दाखवण्यात आलेली फिर्याद तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. पी—१** म्हणजेच **निशाणी क्र. १४** देण्यात येते. मी संदीप गायकवाड याला पाहिल्यास ओळखू शकेन. तो आज न्यायालयात हजर आहे. साक्षीदाराने आरोपीला ओळखले. पोलीसांनी दुसऱ्या दिवशी घटनास्थळाचा पंचनामा केला होता. घटनास्थळ डेअरी फार्मच्या समोरील आमचे गॅरेज होते.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. डी.बी. राणे यांचेमार्फत</u>** :

०३. आता मी १२ वी मध्ये शिकत आहे. घटना घडली त्यावेळी मी अकरावीमध्ये होतो. मी बाणा हायस्कूल, आवास येथे शिकत होतो. मी सकाळी ७.३० वाजता कॉलेजमध्ये जात होतो व ११.३० वाजता परत येत होतो. हे म्हणणे खरे आहे की, डे फार्म म्हणून दुकान आहे डेअरी फार्म म्हणून नाही. हे म्हणणे खरे आहे की, डे फार्मला रस्त्यालगत दगड, रेती, सिमेंटने बांधलेली भिंत आहे. हे म्हणणे खरे आहे की, डे फार्मची भिंत व रस्ता यामध्ये माझ्या काकांचे गॅरेज आहे.

०४. हे म्हणणे खरे आहे की, गॅरेजमध्ये रिपेअरींगसाठी आलेल्या गाड्या रस्त्यावरही लावलेल्या असतात. साक्षीदार सांगतो की, त्या शेडमध्ये लावलेल्या असतात. हे म्हणणे खरे आहे की, ज्या रस्त्यावर घटना घडली तो रस्ता अलिबाग–रेवस व अलिबाग–मांडवा येथे जाणारा मोठा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्त्यावर वाहनांची नेहमी वर्दळ असते.

०५. हे म्हणणे खरे आहे की, या केसमधील साक्षीदार रविंद्र लक्ष्मण पाटील, विशांत मांजरेकर यांच्याशी माझी ओळख आहे. जयंत, मंगेश यशवंत म्हात्रे, सोनू नाईक यांच्यशी माझी ओळख नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे काका स्वत: मेकॅनिक म्हणून काम करत होते. हे म्हणणे खरे आहे की, मी अधूनमधून गॅरेजमध्ये शिकण्यास येत होतो. धोकवडे ते चोंढी यामधील अंतर ०८ कि.मी. आहे. माझ्या घरातील माझे वडील यशवंत, काका रविंद्र यांच्या कुटुंबातील शिकलेली व्यक्ती मी आहे.

०६. हे म्हणणे खरे आहे की, जखमी साक्षीदार मंगेश म्हात्रे, सोनू नाईक यांचा हॉस्पीटलचा खर्च संदीप गायकवाड याने केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला या घटनेमध्ये मार लागला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, घटना घडली त्यावेळी मी घटनास्थळी नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी कुटुंबातील शिकलेली व्यक्ती असल्याने काकांच्या कुटुंबियातर्फे खोटी फिर्याद दिली. मी पोलीसांना सांगितले होते की काकांनी मला पाने आणण्यासाठी आत पाठविले होते. सदर बाब माझ्या फिर्यादीमध्ये का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, अपघाताचा

आवाज आल्यानंतर मला समजले की, अपघात झालेला आहे. मला दारुच्या प्रकाराबाबत माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांच्या सांगण्यावरुन आरोपीच्या तोंडाला दारुचा वास येत होता असे नमूद केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या तोंडाला दारुचा वास येत होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अपघाताबाबत काहीही माहिती नसताना मी खोटी फिर्याद दाखल केलेली आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **२५/०८/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **३२/२०२५**
निशाणी क्र. **१७/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०२** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **विनायक सुरेश गुरव** |
| वय सुमारे | : | ४४ वर्षे, व्यवसाय : वाहनचालक |
| निवासस्थान | : | मु. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

०१. दि. ०९/१२/२०२४ रोजी मला पोलीसांनी बोलावले होते. अपघाताबाबतचा पंचनामा करायचा होता. रेणुका स्टोअर्सच्या बाजूला अपघात झाला होता. रेणुका स्टोअर्सच्या बाजूला गॅरेज आहे त्या गॅरेजमध्ये अपघात झाला होता. ते बाईकचे गॅरेज आहे. पंचनाम्याची वेळ मला आता आठवत नाही. मला पंचनामा दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला वाचून दाखवण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर अनु. क्र. १ वर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. पी—२** म्हणजेच **निशाणी क्र. १८** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. डी.बी. राणे यांचेमार्फत</u>** :

०२. मला मराठी वाचता येत नाही. पोलीसांनी घटनास्थळी माझ्या समक्ष काहीही जप्त केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या बाजूलाच लागून मोठा फार्म हाऊस आहे. हे म्हणणे खरे आहे की, डे फार्मच्या रोडला लागून मोठी दगडी भिंत आहे. हे म्हणणे खरे आहे की, दगडी भिंत व रस्त्याच्या मध्ये गॅरेज आहे. हे म्हणणे खरे आहे की, दगडी भिंतीला लागून डे फार्ममध्ये

जाण्यासाठी रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या बाजूला वडाचे मोठे झाड आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या उत्तरेला विशाल मांजरेकर यांचे दुकान आहे. हे म्हणणे खरे आहे की, हा रस्ता अलिबाग–रेवस, अलिबाग–मांडवा येथे जातो. हे म्हणणे खरे आहे की, या रस्त्यावर दिवसभर जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांची वर्दळ असते. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्यावर भरपूर वाहने येत जात असतात.

०३. हे म्हणणे खरे आहे की, मला थांबण्यासाठी चोंढी नाका आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी वाहनचालक असल्यामुळे चोंढी नाक्यावर थांबलेला असतो. हे म्हणणे खरे आहे की, चोंढी नाक्यावर परहुरपाड्यातील पाटील यांचे दुकान आहे व ते चांगले चालते. हे म्हणणे खरे आहे की, बहुतांश लोक त्या दुकानामध्ये थांबलेले असतात. हे म्हणणे खरे आहे की, पाटील व रविंद्र लक्ष्मण पाटील गॅरेजवाले यांचे नाते आहे.

०४. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्यासाठी गेलो होतो हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझी तयार पंचनाम्यावर सही घेतली. मी निल यशवंत पाटील याला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, निल पाटील, रविंद्र पाटील यांना मदत करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. **( एम्. बी. अत्तार )**

दिनांक : **०६/१०/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **३२/२०२५**
निशाणी क्र. **२०/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०३** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **मंगेश यशवंत म्हात्रे** |
| वय सुमारे | : | ५३ वर्षे, व्यवसाय : कंत्राटदार |
| निवासस्थान | : | मु. आगरसुरे, पो. चोंढी, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

घटना दि. ०८/१२/२०२४ रोजी सायं. ५:०० वाजता चोंढी येथे साई इन हॉटेलच्या बाजूला घडली. मी मेकॅनिक रवी पाटील यांच्याकडे गवत कापण्याचे यंत्र दुरुस्तीकरीता घेवून गेलो होतो. त्यावेळी रवी पाटील हे मेकॅनिकचे काम करत होते. सोनू नाईक हा माझ्यासोबत होता. त्या ठिकाणी रवी मशीनचे काम करत होता व मी तेथे उभा होतो. त्यावेळी पाठच्या दिशेने एक गाडी आली व गॅरेजमध्ये जेथे आम्ही थांबलो होतो तेथे घुसली. माझी पाठ त्या दिशेने होती त्यावेळी एक महिला जोराने अरे, अरे अशी ओरडली. ओरडल्यावर मी पाठीमागे पाहण्यापूर्वीच ती गाडी येवून मला धडकली. सदर धडकेमध्ये मी लांब उडालो व माझा डावा पाय फ्रॅक्चर झाला. रवी गाडीखाली गेला. सोनू नाईकचा पाय फ्रॅक्चर झाला होता. ज्या गाडीने धडक दिली ती गाडी मर्सिडीज किंवा बीएमडब्ल्यू कंपनीची होती. तिचा रंग निळा होता. तिचा क्र. एम् एच् ०६ बी इ २०० असा होता. त्या गाडीचा चालक हा चोंढी येथील होता. त्याचे नाव संदीप गायकवाड असे होते. संदीप गायकवाडला पाहिल्यास मी ओळखू शकेन. तो न्यायालयात हजर आहे. त्यानंतर आरोपीने आम्हाला रिक्षेतून सिव्हील हॉस्पीटल, अलिबाग येथे

नेले. तेथून मला बडगीरे हॉस्पीटलमध्ये नेण्यात आले. बडगीरे हॉस्पीटलमधून मी १२ तारखेला घरी गेलो.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. डी.बी. राणे यांचेमार्फत</u>** :

०२. माझे शिक्षण इयत्ता बारावीपर्यंत झालेले आहे. घटनेनंतर आजपर्यंत त्या गाडीचा नंबर मी लिहून ठेवलेला नव्हता. मी गाडीचा नंबर कोणाला विचारलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या उत्तरेला रेवस मांडवा गाव आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या दक्षिण दिशेला अलिबाग शहर आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी अलिबाग दिशेला माझी पाठ होती. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी माझे व सोनू नाईक यांचे लक्ष रवी जे काम करत होता त्याच्याकडे होते. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी गाडी आली व धडकली त्याच वेळेस आम्हाला अपघात झाल्याचे समजले.

०३. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे अलिबाग–रेवस रस्त्याला लागूनच आहे. हे म्हणणे खरे आहे की, अलिबाग रेवस रस्त्याला लागूनच डे फार्म आहे व त्याची उंच दगडी भिंत आहे. हे म्हणणे खरे आहे की, हे म्हणणे खरे आहे की, डे फार्मची भिंत व रस्त्यामध्ये गॅरेज आहे. हे म्हणणे खरे आहे की, रवी पाटील यांच्या गॅरेजसमोर काम करण्यासाठी सिमेंट कॉक्रीटचा कोबा बनवलेला आहे.

०४. निल पाटील याला मी २ ते ३ वर्षापासून ओळखतो. पोलीसांनी माझा जबाब दि. १२ तारखेला घेतला होता. पोलीसांना जबाब देताना माझा व सोनू नाईकचा पाय फ्रॅक्चर झाला होता, मी धडकेमुळे लांब उडालो होतो ही बाब सांगितली होती. सदर बाब माझ्या जबाबामध्ये का नमूद नाही याचे कारण मी सांगू

शकत नाही. अलिबागकडून रेवसकडे जाताना अपघातस्थळाचा रस्ता हा डावीकडे वळणाचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या आजूबाजूला वडाची झाडे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, जखमींना हॉस्पीटलमध्ये नेण्याची व्यवस्था आरोपीने केली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने कर्तव्य म्हणून उपचाराचा खर्चही केला होता.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **०३/११/२०२५**.

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड—अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **३२/२०२५**
निशाणी क्र. **२१/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०४** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **विशांत विलास मांजरेकर** |
| वय सुमारे | : | ३२ वर्षे, व्यवसाय : प्रियांका जनरल स्टोअर्स |
| निवासस्थान | : | मु. चोंढी, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

दि. ०८/१२/२०२४ रोजी सायं. ०५.३० वाजता चोंढी येथील साई इन हॉटेल येथे डे फार्म जवळ घटना घडली. त्यावेळी मी दुकानात होतो त्यावेळी अचानक धडकल्याचा आवाज आला. समोर एक व्यक्ती ओरडत असल्याचा आवाज आला. मी जावून पाहिले असता अलिबाग येथून एक गाडी येवून अॅगलला धडक देवून मेकॅनिक रवी याच्या अंगावर गेली होती. आम्ही त्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला. ते गाडीखाली होते आम्ही त्यांना काढण्याचा प्रयत्न केला. कोणीतरी अॅम्ब्युलन्सवाल्यांना फोन केला पण अॅम्ब्युलन्स आली नाही. त्यानंतर आम्ही अॅम्ब्युलन्सची वाट न बघता त्यांना बाहेर काढले. लगेचच त्यानंतर त्यांना माझ्या गाडीतून सिव्हील हॉस्पीटल, अलिबाग येथे नेले. ज्या गाडीने धडक दिली होती ती निळ्या रंगाची होती, ती गाडी बी.एम्.डब्ल्यू. कंपनीची होती, तिचा क्रमांक एम् एच् ०६ बी इ २०० असा होता. अपघात झाल्यानंतर मी घटनास्थळी अंदाजे ५ ते १० मिनिटे होतो. वाहनचालकाचे नाव मला नंतर समजले. आमच्या गावातील संदीप गायकवाड

हे वाहनचालक होते. मी संदीप गायकवाडला पाहिल्यास आळखू शकेन. ते आज न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. डी.बी. राणे यांचेमार्फत</u>** :

०२. मी माझ्या जन्मापासून चोंढी गावात राहतो. माझ्या दुकानाचे नाव प्रियांका स्टोअर्स असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दुकानाला लागूनच रविंद्र पाटील यांचे गॅरेज आहे. हे म्हणणे खरे आहे की, डे फार्मची भिंत त्यानंतर रेवस–अलिबाग रस्ता यामध्ये रविंद्र पाटील यांचे गॅरेज आहे. हे म्हणणे खरे आहे की, रविंद्र पाटील यांच्या गॅरेजसमोर सिमेंट कॉक्रीटच्या कोब्यावर गाडी थांबवतात व तिथे गॅरेजचे काम चालते. हे म्हणणे खरे आहे की, चोंढीवरुन अलिबाग येथे माझी माझ्या वाहनावरुन ये जा होत असते. हे म्हणणे खरे आहे की, ज्या ठिकाणी अपघात घडला ते ठिकाण वळणाचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी रस्ता थोडा खचलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, कोणीतरी बाई ओरडली होती म्हणून मी बघण्यासाठी बाहेर आलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्या बाईचे नाव मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, ती बाई कशामुळे ओरडली हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, रस्ता खचलेला असल्यामुळे कधी कधी वाहन उजव्या बाजूला फेकले जाते. हे म्हणणे खरे आहे की, गॅरेज व रस्ता यांमध्ये रस्त्यावर दिशादर्शक लोखंडी फलक आहे.

०३. हे म्हणणे खरे आहे की, अपघात कशामुळे घडला याची मला वैयक्तीक माहिती नाही. पोलीसांनी माझा जबाब अपघाताच्या दुसऱ्या दिवशी

घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की, जखमींना हॉस्पीटलमध्ये नेण्यासाठी आरोपीने मदत केली होती.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.		( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०३/११/२०२५**.		मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **३२/२०२५**
निशाणी क्र. **२३/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०५** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

माझे संपूर्ण नांव : **सोनू मधु नाईक**
वय सुमारे : ५५ वर्षे, व्यवसाय : मजूरी
निवासस्थान : मु. किहीम आदिवासीवाडी, ता. अलिबाग, जि. रायगड

**सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत** :

०१. मी अशिक्षित आहे. माझा ॲक्सीडंट झाला होता. अपघाताची तारीख मला आठवत नाही. मला पाठून ठोकला होता. चोंढीला रवी यांचे गॅरेज आहे तेथे मी मशीन रिपेरींगसाठी घेवून गेलो होतो. माझ्यासोबत मंगेश म्हात्रे होते. मला अचानक पाठीमागून ठोकले होते त्यामुळे मला काहीही समजले नाही. मला सिव्हील हॉस्पीटलमध्ये नेण्यात आले होते. माझा पाय मोडला होता. सिव्हील हॉस्पीटलमध्ये मला एक हप्ता ठेवण्यात आले होते तेथून मला दुसऱ्या हॉस्पीटलमध्ये नेण्यात आले होते. तेथे माझे ऑपरेशन झाले होते.

**(साक्षीदार पूर्वी दिलेल्या जबानीपेक्षा विसंगत साक्ष देत असल्याने सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली**.)

**उलटतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत** :

०२. हे म्हणणे खरे आहे की, मला मागून कारने धडक दिल्यानंतर मी टू व्हीलर बाईकला पकडले व उभा राहिलो मी पूर्ण खाली पडलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी मागे पाहिले होते की कोणी धडक दिली. हे म्हणणे खरे आहे

की, आरोपी संदीप गायकवाड याच्या गाडीने धडक दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, गाडी आरोपी संदीप गायकवाड चालवत होता. हे म्हणणे खरे आहे की, गाडीची ठोकर दिल्यानंतर आरोपी तेथून पळून गेला होता. हे म्हणणे खरे आहे की, तो पळून जात असताना त्याचा चेहरा मी पाहिला. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

**उलटतपास पूर्ण**.

**उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. डी.बी. राणे यांचेमार्फत** :

०३. माझ्या पत्नीचे नाव गंगी आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी व माझी पत्नी रोज चोंढी बाजाराला जातो. हे म्हणणे खरे आहे की, जे आदीवासी लोक आहेत ते चोंढी बाजारामध्ये रेल्वेच्या पटरीवर बसतात. हे म्हणणे खरे आहे की, अपघातस्थळ रवीचे गॅरेज हे माझ्या रोजच्या पाहण्यातील आहे. हे म्हणणे खरे आहे की, गॅरेजच्या पाठीमागे मोठे फार्म हाऊस आहे. हे म्हणणे खरे आहे की, फार्म हाऊसची भिंत व रस्त्याच्या मध्ये रवी पाटील याचे गॅरेज आहे.

०४. रवी पाटीलच्या गॅरेजच्या समोर गाड्या दुरुस्तीसाठी सिमेंट कॉक्रीटचा कोबा केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी आम्ही त्या कोब्यावर बसलेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही जेथे बसलो होतो तेथे दिशादर्शक फलक आहे. हे म्हणणे खरे आहे की, रवी पाटील काम करत होते व ते आम्ही बघत होतो त्यामुळे आमचे येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांकडे लक्ष नव्हते.

०५. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावरुन एक बुलेट मोटरसायकल वेगात गेली. हे म्हणणे खरे आहे की, एक बाई जोरात ओरडण्याचाही आवाज आला होता. हे म्हणणे खरे आहे की, मला इंग्लीश कळत नाही, गाडीचा नंबर

कळत नाही. हे म्हणणे खरे आहे की, गाडीचा नंबर पोलीसांनी लिहीला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझा दवाखान्याचा खर्च आरोपी संदीप याने केला होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने दुसऱ्या जखमीच्या दवाखान्याचा खर्च केला होता.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **२४/११/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

**R.C.No. 32/2025**
Exh. **25/C**

Deposition of Witness No. **06** for the State

I do hereby on solemn affirmation state that :-

My Name : **Dr. Kimaya Kishor Thale**
Age about : 29 Years,
Occupation : Medical Officer, Jr. Resident Symbosis Hospital, Pune
Residence : Jr. Resident Symbosis Hospital, Pune

**Examination-in-Chief by A.P.P. Shri. Prasad S. Patil** :

01. I am qualified as M.B.B.S. On 08/12/2024 I was attached to Civil Hospital, Alibag as a Casualty Medical Officer. My duty time was 9 am to 9 pm. On that day at 5.30 pm Ravindra Laxman Patil, aged 58 years had brought to the hospital by his relatives. A the same time three injured including Ravidnra came to hospital. The other injured were Sonu Madhu Naik and Mangesh Yashwant Mhatre. They were brought by their relatives. The person who committed the accident also accompanied them.

02. On that day I examined the patient namely Ravindra Laxman Patil and found following injuries:

1. Contused lacerated wound over left temporo-parietal region of scalp size 05 cm x 01 cm x 0.5 cm deep, margins irregular, red in colour.
2. Contused lacerated wound over right parietal region of scalp size 01 cm x 01 cm x 0.5 cm deep, margins irregular, red in colour.
3. Lacerated wound over left upper lip size 02 cm x 0.5 cm x 0.5 cm deep, margins irregular, red in colour.

4. Lacerated wound over left upper lip, muscle aspect size 01 cm x 1 cm x 0.5 cm deep, margins irregular, red in colour.

5. Graze abrasion over left zygomatic prominance of face size 02 cm x 02 cm red in colour.

6. Abrasion over right parietal region of scalp size 02 cm x 02 cm red in colour.

7. Lacerated wound over high parietal region of scalp on both sides size 4 cm x 01 cm x 0.5 cm margins irregular, red in colour.

8. Lacerated wound over left ear lobule with detachment from rest of pinna 3 x 2 cm. cartilage deep

9. Contusion over left upper chest, involving clavicular region size 05 cm x 03 cm, red in colour

10. Contusion over left arm upper, upper one third, laterally situated 06 cm below shoulder size 05 cm x 03 cm, red in colour.

11. Abrasion over right arm, upper one third, medially size 06 cm x 01 cm, red in colour.

12. Contused abrasion over left axillary region size 06 cm x 02 cm, red in colour.

13. Lacerated wound over left arm, middle one third, anterior- laterally, placed horizontal size 11 cm x 01 cm x 0.1 cm deep, semi-circular shape, margin irregular, red in colour.

14. Multiple abrasions over both knees over an area of size 06 cm x 05 cm, varying in size from 01 cm x 01 cm to 0.5 cm x 0.5 cm, red in colour.

15. Abrasion over dorsum of right foot, base of little toe size 01 cm x 01 cm, red in colour.

16. Abrasion over left upper iliac region size 08 cm x 06 cm red in colour.

03. All the injuries were caused by hard and blunt object. All the injuries were caused within 06 hours. Injury No. 1 to 8, 11,

14 to 16 were simple in nature. Injury No. 9, 10, 12, 13 were grievous in nature.

04. I gave the primary treatment and he was referred to MGM Hospital.

05. Accordingly, I issued injury certificate. The injury certificate now showed to me is the same. Its contents are true and correct and it bears my signature. It is marked as **Exh. 26.**

06. On that day I examined the patient namely Sonu Madhu Naik and found following injuries:

1. Three lacerated wounds over left leg shin, middle 1/3rd of leg of sizes 04 cm x 1 cm x 0.1 cm, x 0.1 cm x 0.1 cm and 0.1 cm x 0.1 cm.
2. Three contused lacerated over right leg shin, middle 1/3 rd of leg of sizes 02 cm x 1 cm x 0.2 cm, 0.5 cm x 0.5 cm, and 0.5 cm x 0.5 cm
3. Abrasion over right foot heel, medial aspect size 1.5 cm x 1.5 cm, red in colour

07. All the three injuries were caused by hard and blunt object and were caused within 06 hours. Injury No. 1 and 3 were simple in nature and injury No. 2 was grievous in nature.

08. Accordingly, I issued injury certificate. The injury certificate now showed to me is the same. Its contents are true and correct and it bears my signature. It is marked as **Exh. 27.**

09. On that day I examined the patient namely Mangesh Yashwant Mhatre and found following injuries:

1. Tenderness with swelling over left ankle, lower 1/3rd of leg
2. Abrasion over right thumb base dorsal aspect size 02 cm x 0.5 cm red in colour.

10. Both the injuries were caused by hard and blunt object. Both the injuries were caused within 06 hours. Injury No. 1 was grievous in nature and injury No. 2 was simple in nature.

11. Accordingly, I issued injury certificate. The injury certificate now showed to me is the same. Its contents are true and correct and it bears my signature. It is marked as **Exh. 28.**

12. The relatives narrated me the history of vehicle stepping on the patient's body on 08/12/2024 at around 05:15 pm.

13. I cannot state the exact speed of the vehicle, but it may have been travelling at a high speed. I cannot specify what that high speed might have been. At the time of the accident, three patients had sustained injuries, including spinal injury and fractures to the arms of one patient. Considering the nature and severity of these injuries, it is possible that the vehicle was travelling at a high speed.

14. I examined Sandip Vilas Gaikwad and conducted a physical assessment. At the time of examination, his blood pressure was slightly elevated but returned to normal within fifteen minutes. I issued Form A, in which I recorded that Sandip Vilas Gaikwad was not in a drunken state. His speech was normal, his gait was normal, and his pupils were non-dilated. In my

professional opinion, he was not under the influence of alcohol. A blood sample was nevertheless taken for alcohol analysis. The blood report was negative for alcohol. The Form A now shown to me is the same document that I issued. Its contents are true and correct, and it bears my signature. It is marked as **Exhibit 29**.

**Examination-in-Chief complete**.

**Cross-Examination for accused by Adv. Shri. D.B. Rane** :

15. I joined the hospital as a Medical Officer in April 2023. I am unable to state whether all the patients could have survived with proper treatment. I further state that fracture-related treatment was available at the civil hospital; however, other required treatments were not available there. Therefore, the patient was referred to MGM Hospital.

16. It is true to say that I have no record indicating that any of the patients examined on that day had died. It is also true to say that upon examining the accused on that day, I found him to be normal.

Cross-examination complete.

No Re-examination

R. O. & A. C.

( **M. B. Attar** )
Chief Judicial Magistrate,
Raigad-Alibag

Alibag.
Dt. **08/12/2025.**

:: **CERTIFICATE** ::

Taken before me and signed by me in the presence of accused to whom the deposition is explained in vernacular and full opportunity to cross-examine the witness, is given.

( **M. B. Attar** )
Chief Judicial Magistrate,
Raigad-Alibag

Alibag.
Dt. **08/12/2025.**

नियमीत फौजदारी खटला क्र. **३२/२०२५**
निशाणी क्र. **३१/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०७** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **सुमित कल्लाप्पा खोत** |
| वय सुमारे | : | ३२ वर्षे, व्यवसाय : पोलीस उपनिरीक्षक |
| सध्या नेमणूक | : | मांडवा सागरी पोलीस ठाणे |
| निवासस्थान | : | मु. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

०१. घटना दि.०८/१२/२०२४ रोजी घडली होती. दि. ०९/१२/२०२४ रोजी तपासकाम माझ्याकडे आले. गुन्हा रजि. क्र. १२१/२०२४ चा तपास वरिष्ठांच्या आदेशाने माझ्याकडे देण्यात आला. मी फिर्यादीचे अवलोकन केले. तपासकाम माझ्याकडे आल्यानंतर सर्वप्रथम मी दोन पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. दि. ०९/१२/२०२४ रोजी मी घटनास्थळाचा पंचनामा केला. आता मला दाखवण्यात आलेला निशाणी क्र. १८ कडील पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी व दोन पंचांच्या सह्या आहेत.

०२. मी इ—साक्ष ॲपमध्ये व्हिडीओग्राफी केली. आरोपीची वैद्यकीय तपासणी करुन घेतली. जखमी व इतर साक्षीदारांचे तपास टिपण नोंदवले. मी आरोपीला हजर राहण्याबाबत नोटीस दिली. आरोपीचे वाहन ०८ तारखेला पोलीस ठाण्यात तपासणीसाठी जमा केले. वाहन तपासणीबाबतचा अहवाल आर.टी.ओ. कार्यालयातून प्राप्त झाला. आता मला दाखवण्यात आलेला आर.टी.ओ. कार्यालयाचा रिपोर्ट तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ३२** देण्यात येते.

०३. मी जमखींचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी सिव्हील हॉस्पीटल, अलिबाग व एम.पी.सी.टी. हॉस्पीटल, नवी मुंबई यांना पत्र दिले. आता मला दाखवण्यात आलेले पत्र तेच आहेत. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास अनुक्रमे **निशाणी क्र. ३३ व ३४** देण्यात येते.

०४. आरोपीच्या रक्ताचे नमुने न्यायवैद्यक प्रयोगशाळा, कलीना येथे तपासणीसाठी पत्राद्वारे पाठविले. आता मला दाखवण्यात आलेले पत्र तेच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. ३५** देण्यात येते. न्यायवैद्यक प्रयोगशाळा, कलीना यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर मी तो न्यायालयात दाखल केला. आता मला दाखवण्यात आलेला न्यायवैद्यक प्रयोगशाळा, कलीना यांचा अहवाल तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ३६** देण्यात येते. माझ्या तपासात आरोपीने हयगयीने वाहन चालवून अपघात केल्याचे निष्पन्न झाल्याने मी त्याच्याविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. डी.बी. राणे यांचेमार्फत</u>** :

०५. दि. ०२/०७/२०२३ पासून मी मांडवा सागरी पोलीस ठाण्यात नेमणुकीस आहे. अलिबागपासून रेवस व मांडवा हे अंतर अंदाजे २० कि.मी. आहे. हे म्हणणे खरे आहे की, चोंढी गावाच्या अलिकडे रेल्वे क्रॉसिंग आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद घेतल्यानंतरचा पुढील सर्व तपास मीच केलेला आहे. आरोपी जागेवरुन पळून गेल्याबाबत कोणीही सांगितले नाही. निल यशवंत पाटील हा अपघाताच्या वेळी उपस्थित असल्याचे साक्षीदारांनी त्यांच्या जबाबात सांगितले नव्हते.

०६. हे म्हणणे खरे आहे की, अपघातस्थळी रस्ता थोडा वळणाचा होता. हे म्हणणे खरे आहे की, विशांत विलास मांजरेकर, मंगेश यशवंत म्हात्रे यांचे जबाब मी नोंदवले होते. माझ्या तपासात एक महिला ‘अरे, अरे’ म्हणून जोरात ओरडल्याचे निष्पन्न झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, एक गाडी जोराने रेवस दिशेकडे निघून गेली असे माझ्या तपासात निष्पन्न झाले. हे म्हणणे खरे आहे की, डे फार्मची भिंत व रस्ता यामध्ये गॅरेज आहे. हे म्हणणे खरे आहे की, गॅरेजसमोर गाडी पार्कीगसाठी सिमेंटचा कोबा केलेला होता.

०७. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी चोंढी गावातील सामाजिक कार्यकर्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, जखमींचा वैद्यकीय खर्च आरोपीने केला होता. हे म्हणणे खरे नाही की, निल यशवंत पाटील हा घटनेच्या वेळी हजर नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, तो गॅरेज मालकाचा पुतण्या असल्याने खोटी फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा काहीही दोष नसताना खोटे दोषारोपपत्र दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीविरुद्ध फिर्याद असल्याने मी खोटे दोषारोपपत्र दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, अलिबाग–रेवस रस्त्यावर वडाची मोठी झाडे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, निल यशवंत पाटील याला कोणतीही इजा झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. **( एम्. बी. अत्तार )**
दिनांक : **२५/०२/२०२६**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.